University of Pune
Pune-411 007
Board of College and University Development

# राज्यस्तरीय "आविष्कार" स्पर्धेत पुणे विद्यापीठाची हॅट्रिक ! ! !

महाविद्यालयीन तसेच विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी २००६ या वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या "आविष्कार" संशोधन प्रकल्प स्पर्धेत पुणे विद्यापीठाने **सलग तिसऱ्या वर्षी** सर्वसाधारण विजेतेपद पटकावून **हॅट्रिक** केली.
मा. **कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव** यांनी पुणे विद्यापीठाची सुत्रे हाती घेतल्यानंतर महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील संशोधनास चालना देण्याच्या दृष्टीकोनातून सुरू केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे हे यश मिळाले आहे.

अमरावती येथील "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" येथे ८ ते १० जानेवारी २००९ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय **"आविष्कार"** स्पर्धेचा शनिवारी समारोप झाला. या स्पर्धेत राज्यातील १९ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. अंतिम फेरीत एकूण ३७ पारितोषिकांपैकी १४ पारितोषिके पटकावून पुणे विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. व मुंबई विद्यापीठाला ६पदके मिळवून दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत मानव्य, भाषा व कला, वाणिज्य व व्यवस्थापन, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषध निर्माण शास्त्र, व शेती व पशुपालन अशा सहा विद्याशाखांध्ये एकूण ४९३ प्रकल्प सादर झाले. पहिल्या फेरीत सर्व प्रकल्प पोस्टरव्दारे सादर केले व ह्यातील ८६ निवडक प्रकल्प दुसऱ्या फेरीत सादरीकरणासाठी निवडले. यातील ३७ विद्यार्थ्यांचे प्रकल्प विजयी घोषित करण्यात आले. या ३७ प्रकल्पांपैकी पुणे विद्यापीठाच्या १४ विद्यार्थ्यांचे प्रकल्प विजयी ठरले. ६ विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे तर ८ विद्यार्थ्यांना व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

मानव्य, भाषा व कला, वाणिज्य व व्यवस्थापन, मूलभूत विज्ञान, वैद्यक व औषध निर्माण शास्त्र हया **चारही** विद्याशाखानिहाय चषकावर पुणे विद्यापीठाने निर्विवाद वर्चस्व गाजवले तर मुंबई विद्यापीठाला शेती व पशुपालन या एका विद्याशाखानिहाय चषकावर समाधान मानावे लागले. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान हा चषक पुणे व एस.एन.डी.टी विद्यापीठाला विभागून मिळाला.

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक **डॉ. पंडित विद्यासागर** यांच्या मार्गदर्शनाखाली **डॉ. के.सी.मोहिते** यांनी विद्यार्थ्यांच्या तयारीकरीता तसेच उत्कृष्ट प्रकल्प निवडले जावेत या उद्देशाने यावर्षी पुणे विद्यापीठाच्या वतीने ९ ठिकाणी विभागीय स्पर्धेचे आयोजन केले होते. यात तीन हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी होऊन ७६० प्रकल्प सादर झाले. यातून निवडलेल्या २११ प्रकल्पांची विद्यापीठ स्तरावर स्पर्धा घेऊन त्यातील ३६ प्रकल्प राज्यस्तरीय स्पर्धेत सादर केले गेले. गेल्या सहा महिन्यांपासून यासाठी तयारी चालू होती. राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे सादरीकरण परिणामकारक व्हावे व स्पर्धेस जाताना त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी विद्यापीठामध्ये विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नामवंत तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी **डॉ. मोहन वामन** व **डॉ. स्वाती भावसार** यांनी संघ व्यवस्थापक तर सहाय्यक म्हणून मोनिष गादिया, अदिती देशमुख व राहूल कदम यांनी काम केले.
या स्पर्धेच्या आयोजनात विविध महाविद्यालयाच्या प्रचार्यांचे, प्राध्यापकांचे सहकार्य मिळाले तसेच मान्यवर तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. अशी माहिती स्पर्धेचे समन्वयक व विशेष कार्याधिकारी डॉ. के.सी. मोहिते यांनी दिली.

KMohite
**डॉ. के.सी. मोहिते**
**विशेष कार्याधिकारी. म.वि.वि.मं**

**डॉ. पंडित विद्यासागर**
**संचालक. म.वि.वि.मं**

Tel. : Office-(020) 25601114/15
E-mail : bcud@unipune.ernet.in
Fax : +91-020-25693899 /
Telefax : +91-020-25698007

University of Pune
Pune-411 007
Board of College and University Development

अमरावती येथे झालेल्या स्पर्धेतील पुणे विद्यापीठाचे विद्याशाखानिहाय विजेते:

| विद्याशाखा | विद्यार्थ्यांचे नाव व क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | प्रकल्पाचे शीर्षक |
|---|---|---|---|
| मानव्य, भाषा व कला | दिपाली अवकाळे<br>व्दितीय (PG) | Fergusson College | Romancing The Classical Dance |
| | प्रफुल्ल अडागळे<br>प्रथम (PPG) | Department Of Defence & Strategic Studies, UoP | New Face Of Terrorisom: India's Counter Strategy |
| वाणिज्य व व्यवस्थापन | जयेश चौधरी<br>प्रथम (UG) | Sangamner Collge, Sangamner | Jagruti Veej Bachatichi |
| | जितेंद्र खरोटे<br>प्रथम (PG) | School Of Energy Study, UoP | Energy Management In Buildings |
| | जी. श्यामला<br>व्दितीय (PPG) | Department Of Commerce, UoP | Implication Of IPL Expt. Innovative Practices In Marketing |
| मूलभूत विज्ञान | संदीप लबडे<br>प्रथम (UG) | R .B.N.B. College, Shrirampur | Applications of Jatropha carcus latex |
| | रमाकांत शर्मा<br>प्रथम (PG) | Fergusson College | Cd-Te nanoparticles synthesis and properties |
| | हेमांगी कोटीभास्कर<br>व्दितीय (PG) | R.Y.K. Science College, Nashik | Kidney stone feeders |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | सौरभ मुथा<br>व्दितीय (UG) | Smt. Kashibai Navale Engineering. College, Pune | Adaptable Virtual Keyboard |
| | शेखर सावंत<br>व्दितीय (PG) | New Arts, Commerce, Science College, A'nagar | Novel fodder cutting machine |
| वैद्यक व औषध निर्माण शास्त्र | मेघा सारस्वत<br>प्रथम (UG) | Sinhagad Institute of Pharmacy, Lonawala | Cardioprotective activity of Os. |
| | शैलेश बोरा<br>व्दितीय (UG) | SGRS College of Pharmacy, Saswad,Pune | Extraction and application of orangetubular calyx of *Nyctanthes orortritis* |
| | ए. बलराज<br>व्दितीय (PPG) | Department of Physics, UoP | Application of Co60 gamma rays and FBX dosimetry to head and neck squamous cell carcinoma patients |
| शेती व पशुपालन | विक्रम भोसले<br>व्दितीय (UG) | Sinhagad College of Engineering, Vadgaon, Pune | Automated Irrigatiob System |

K Mohite

डॉ. के.सी. मोहिते
विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं

13/1

डॉ. पंडित विद्यासागर
संचालक, म.वि.वि.मं